## निशाणी क्र. १२३, १२४ व १२५ वरील एकत्रित आदेश

मयत वादी क्रमांक ४ चे वारस यांनी प्रस्तुतचे अर्ज मयत वादी विरुद्ध झालेला अवसायन हुकूम रद्द होवून, झालेला विलंब माफ होवून, मयत वादीचे वारस दाव्यात समाविष्ट करण्यासाठी दाखल केले आहेत.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीं तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. दावा मिळकतींचे वाटप होवून स्वतंत्र कब्जा मिळणेसाठी वादींनी प्रस्तुत दावा दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादींविरुद्ध दावा चालविण्याचा अधिकार वादीचे वारसांना प्राप्त होतो. सबब मयत वादीचे वारस याकामी अभिलेखावर घेणे आवश्यक व गरजेचे आहे. वादी क्रमांक ४ हे दिनांक ०४/०४/२०२१ रोजी मयत झाले आहेत याबाबत वाद नाही. प्रस्तुत अर्ज दिनांक १९/०१/२०२२ रोजी दाखल करण्यात आले आहेत असे दिसून येते. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सु मोटू रिट पिटीशन (दिवाणी) क्रमांक ३/२०२० मध्ये दिनांक १० जानेवारी २०२२ च्या आदेशान्वये दिनांक १५/०३/२०२० ते २८/०२/२०२२ हा कालावधी, कोणताही दावा, अर्ज, अपील किंवा प्रकरण दाखल करण्यास आवश्यक असणा–या विहित मुदतीमधून वगळण्यात यावा असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्रस्तुतचे अर्ज हे मुदत बाहय आहेत असे म्हणता येणार नाही. सबब वरील कारणास्तव हे अर्ज मंजूर होणेस पात्र आहेत असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतात.

२. पुढील तारखेपर्यंत वादी क्रमांक ४ चे वारस यांनी त्यांची नावे वादी क्रमांक ४ चे वारस म्हणून दाव्यात समाविष्ट करुन दावा दुरुस्त प्रत दयावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

GIRISH SUDARSHAN MANE

Digitally signed by GIRISH SUDARSHAN MANE
Date: 2022.02.10 14:55:57 +0530

स्थळ : कोरेगाव
दिनांक : ०९/०२/२०२२

दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.